॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर ▪ बुधवार, दि. १७ जून २०२६ ▪ वर्ष ७ वे ▪ अंक १७ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145


*** सुविचार ***

संधी प्रत्येक सकाळी तुमचं दार ठोठावते, पण तुम्ही झोपलेले असाल तर ती निघून जाईल.

## SPOT NEWS

### महाराष्ट्रात ६९ टक्के पावसाचे प्रमाण कमी

● **मुंबई** – यंदा मान्सून अंदमानात वेगाने दाखल झाला असला तरी त्याला ब्रेक लागला आहे. देशातीत बहुतांश भागासह महाराष्ट्रात मान्सूनच्या वाटचालीत खंड पडला आहे. जूनच्या मध्यापर्यंत देशपातळीवर पावसाचे प्रमाण तब्बल ६४ टक्के कमी झाले आहे. तर महाराष्ट्रात ही तूट ६९ टक्क्यांवर पोहोचली आहे. यामुळे शेती क्षेत्रावर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले आहे. तर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पाणीकपात करण्यात आली आहे. समुद्रात ओलाव्याची कमतरता नाही, असे हवामान तज्ज्ञांचे मत आहे. वातावरणाच्या वरच्या स्तरांतील वा-यांमध्ये झालेल्या बदलांमुळे मान्सूनची यंत्रणा कमकुवत झाली आहे. त्यामुळे ढग तयार होण्याची प्रक्रिया मंदावली आहे. परिणामी मान्सून देशात दाखल झाला असला, तरी अपेक्षित पाऊस पडत नाही, असे हवामान तज्ज्ञांनी म्हटले आहे.

### भीमाशंकर दर्शनासाठी व्हीआयपी दर्शन बंद..!

● **पुणे** – बारा ज्योतिर्लिंगांपैकी सहावे ज्योतिर्लिंग असलेल्या श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिराचे दरवाजे तब्बल पाच महिन्यांनंतर भाविकांसाठी खुले झाले. विकासकामांमुळे ९ जानेवारी २०२६ पासून बंद असलेले मंदिर जिल्हाधिका-यांनी घालून दिलेल्या नियम व अटींनुसार १५ जूनपासून दर्शनासाठी खुले करण्यात आले. मात्र, केवळ ऑनलाईन नोंदणी केलेल्या भाविकांनाच प्रवेश देण्यात आल्याने पहिल्याच दिवशी 'हर हर महादेव'च्या जयघोषात एक हजार भाविकांनी पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेतले. श्रीक्षेत्र भीमाशंकर हे देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असून वर्षभर लाखो भाविक, पर्यटक आणि निसर्गप्रेमी येथे भेट देत असतात. कोरोनानंतर भाविकांची वाढती गर्दी, अपुऱ्या सुविधा आणि २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन २८८.१७ कोटी रुपयांच्या विस्तृत विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार मंदिर परिसरात विविध विकासकामांना सुरुवात करण्यात आली आहे. सभामंडपाचे काम अंतिम टप्प्यात आल्याने जिल्हा प्रशासनाने दररोज फक्त एक हजार ऑनलाईन नोंदणीकृत भाविकांना दर्शन देण्याचा निर्णय घेतला आहे.

# भाऊसाहेब वाकचौरेंसह ठाकरेंचे ४ खासदार दिल्लीत!

## ऑपरेशन टायगरची चर्चा । आज लोकसभा सभापतींची घेणार भेट?

● **मुंबई । वीरभूमी** –

उद्धव ठाकरे यांची शिवसेना फुटीच्या उंबरठ्यावर असून एकनाथ शिंदे यांच्याकडून ऑपरेशन टायगर सुरू करण्यात आल्याच्या चर्चा चांगल्याच रंगल्या आहेत. उद्धव ठाकरे यांनी बोलावलेल्या बैठकीला ९ पैकी फक्त ४ खासदार उपस्थित असल्याने या चर्चांना आणखी बळ मिळाल्याचे सांगितले जात आहे. त्यातच ठाकरेंचे ४ खासदार चार्टर्ड विमानाने दिल्लीत दाखल झाल्याची माहिती आहे. दरम्यान, ६ खासदार शिंदे सेनेत जाणार असल्याचे सांगितले जात आहे. उद्या सकाळी ठाकरे सेनेचे खासदार लोकसभा अध्यक्षांची भेट घेऊ शकतात. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उदय सामंत यांच्यात नंदनवनवर बैठक झाली. त्यानंतर तेही रात्री उशिरा दिल्लीला रवाना झाल्याचे समजते.

नांदेड विमानतळावरून मंगळवारी सायंकाळी ७.३० वाजता चार्टर्ड विमान दिल्लीकडे रवाना झाले. यात परभणीचे खासदार संजय जाधव, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर आणि यवतमाळ-वाशिमचे






खासदार संजय देशमुख याच्यासह ३ खासदार त्यामध्ये असल्याची माहिती आहे. यासोबतच शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरेही दिल्लीत दाखल झाल्याची माहिती आहे. हे सर्व खासदार हे नॉट रिचेबल असल्याचे सांगितले जात आहे. हे खासदार बुधवारी लोकसभा अध्यक्षांची भेट घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. याशिवाय संजय दिना पाटील मुंबईत आणि ओमराजे निंबाळकर पुण्यात असल्याची माहिती आहे. असे जरी असले तरी ठाकरे गटाचे ६ खासदार शिंदेसेनेत दाखल होणार असल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे सेनेचे केंद्रीय मंत्री प्रताप जाधव यांनी दिल्लीत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतल्याचीही माहिती आहे.

बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसमध्ये फुट पडल्यानंतर राज्यात ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू झाली. त्यात १४ जून रोजी उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या खासदारांची एक बैठक बोलावली होती. त्यामध्ये ५ खासदार अनुपस्थित होते. संजय जाधव हे परभणीत धोंडे जेवणाचा कार्यक्रम असल्यामुळे अनुपस्थित राहिल्याचे सांगण्यात आले. त्यांच्यासोबत हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, यवतमाळचे खासदार संजय देशमुख आणि शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे हेही अनुपस्थित होते.

परभणीचे खासदार संजय जाधव हे आधीपासून नाराज असल्याची माहिती आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीप्रमाणे संजय जाधव यांना केंद्रात मंत्रिपद देण्याचे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती आहे. तसेच त्यांच्या मतदारसंघात मोठा निधीही देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. तसेच हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या मतदारसंघातही मोठा निधी देण्याचे आश्वासन दिल्याची माहिती आहे.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्यात नंदनवन बंगल्यात रात्री बैठक झाली. त्यानंतर ते रात्री उशिरा दिल्लीसाठी रवाना झाल्याचे समजते. यामुळे आता ऑपरेशन टायगरला वेग आल्याची चर्चा आहे.

ठाकरे सेनेचे खासदार अरविंद सावंत हे पक्षाचे लोकसभेतील गटनेते आहेत. त्यामुळे अरविंद सावंत यांच्यासह अनिल देसाई, खा. संजय राऊत यांनी कायदेशीर प्रक्रिया सुरू केली असल्याचीही सूत्रांची माहिती आहे.

## दीड वर्षाच्या मुलाला फाशी देत आईनेही घेतला गळफास; राहुरी तालुक्यातील घटना

● **राहुरी । वीरभूमी** –

तालुक्यातील कोळेवाडी येथे एका ३१ वर्षीय विवाहितेने आपल्या दीड वर्षाच्या मुलाला फासावर लटकवून नंतर स्वतः गळफास घेतल्याची हृदय पिळवटून टाकणारी दुर्दैवी घटना दि. १६ जून रोजी सकाळी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे राहुरी तालुका हादरला असून कारण अद्याप अस्पष्ट आहे. आशा सुर्यभान आंबेकर (वय ३१) व शिवांश सुर्यभान आंबेकर (वय दीड वर्षे, रा. चोपडे वस्ती, कोळेवाडी, ता. राहुरी) असे मृतांची नावे आहेत. या घटने बाबत मिळालेली माहिती अशी की, आशा सुर्यभान आंबेकर यांचा सुमारे तीन वर्षांपूर्वी विवाह झाला होता. घरगुती कारणाच्या वादातून आशा आंबेकर या गेल्या एक वर्षांपासून माहेरी संगमनेर येथे राहत होत्या. चार-पाच दिवसांपूर्वीच त्या सासरी कोळेवाडी येथे आल्या.

दि. १५ जून रोजी रात्री आशा आंबेकर आपल्या दीड वर्षाच्या मुलासह दाराला आतून कडी लावून झोपल्या होत्या. मध्यरात्रीच्या सुमारास आशा आंबेकर यांनी आपल्या राहत्या घरात अगोदर त्यांच्या दीड वर्षाच्या मुलाला दोरीच्या सहाय्याने फाशी दिली. त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपवली. सुर्यभान आंबेकर हे दि. १६ जून २०२४ रोजी सकाळी झोपेतून उठले. तेव्हा त्यांनी घराच्या खिडकीतून आत डोकावले असता त्यांची पत्नी व दीड वर्षाचा चिमुकला मुलगा फासावर लटकल्याचे त्यांना दिसले. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, पोलिस कॉन्स्टेबल रामनाथ सानप यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि स्थानिक तरुणांच्या मदतीने घराचा दरवाजा तोडून मृतदेह फासावरून खाली उतरवले. रुग्णवाहिकेतून आई व मुलाचा मृतदेह राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला. शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

आशा आंबेकर यांनी पोटच्या मुलाला फाशी देऊन स्वतः गळफास का घेतला? याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र हृदय पिळवटून टाकणाऱ्या या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## भाजपा युवा मोर्चाची नगर दक्षिण जिल्हा कार्यकारिणी जाहीर

### ३४ जणांचा समावेश । कृष्णा राजळेंची सरचिटणीसपदी निवड

● **पाथर्डी । वीरभूमी** –

भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष (दक्षिण) सचिन वायकर यांनी ३४ जणांची युवा मोर्चाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली असून यामध्ये ११ उपाध्यक्ष, ४ सरचिटणीस, ८ चिटणीस, ५ जिल्हा कार्यकारणी सदस्य, २ सोशल मिडीया प्रमुख, कोषाध्यक्ष, कार्यालयीन प्रमुख, प्रसिद्धीप्रमुख यांचा समावेश आहे. आ. मोनिका राजळे यांचे चिरंजीव कृष्णा राजळे यांची जिल्हा सरचिटणीस तर भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांचे चिरंजीव प्रथमेश भालसिंग यांची प्रसिद्धीप्रमुख पदावर निवड झाल्याने निवडीचे स्वागत होत आहे.

जिल्हाध्यक्ष सचिन वायकर यांनी मंगळवारी जाहीर केलेल्या जिल्हा कार्यकारीणीमध्ये जिल्हा उपाध्यक्ष (११) सुदर्शन कोपनर (कर्जत), पंकज कारखेले (पारनेर), सोमनाथ अकोलकर (पाथर्डी), सागर फडके (शेवगाव), यशवंत पन्हाळकर (नगर), बाळासाहेब मोहारे (श्रीगोंदा), आकाश ढाकणे (नगर), संतोष हरेर (नगर), महादेव पाटेकर (शेवगाव), दीपक हिरवाळे (श्रीगोंदा), अण्णासाहेब डोके (शेवगाव), जिल्हा सरचिटणीस (४) कृष्णा राजीव राजळे (पाथर्डी), गणेश भालसिंग (नगर), दिपक रामनाथ वाबळे (राहुरी), प्रणव मनोज कुलकर्णी (जामखेड).

जिल्हा चिटणीस (८) दिनेश उंडे (राहुरी), महेश बाबासाहेब बोरुडे (पाथर्डी), किरण गर्जे (पाथर्डी), अभिषेक नवले (पारनेर), बाजीराव गोपाळघरे (जामखेड), बाबासाहेब सावळकर (शेवगाव), जयदीप सालके (पारनेर), सोमनाथ कळमकर (शेवगाव).

कोषाध्यक्ष अशोक कांजणे (पाथर्डी), सोशल मिडीया प्रमुख नारायण मडके (शेवगाव), गोकुळ काशिनाथ नेटके (कर्जत). प्रसिद्धी प्रमुख – प्रथमेश दिलीप भालसिंग, कार्यालयीन प्रमुख अक्षय आश्रु बोरुडे (पाथर्डी), जिल्हा कार्यकारिणी सदस्य (५) निलेश ठाणगे (पारनेर), गोपीनाथ किसन खामगळ (कर्जत), नवनाथ आरोळे (पाथर्डी), संदीप बुधवंत (कर्जत), संकल्प धनंजय शिंदे (पारनेर) यांच्या निवडी जाहीर केल्या आहेत. या निवडी प्रदेशाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, भाजपाचे नेते व लोकप्रतिनिधी यांच्या सुचनेनुसार केल्याचे जिल्हाध्यक्ष सचिन वायकर यांनी सांगितले. कार्यकारीत सर्व घटकाला प्रतिनिधीत्व दिले असून भाजपाचे संघटन वाढण्यास मदत होणार आहे.

# कोळी समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## जात वैधता प्रमाणपत्रासाठी तातडीने परिपत्रक काढण्याची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी आमदार रमेशदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोळी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी समाजबांधवांनी निदर्शने करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

अनुसूचित जमातीतील कोळी समाजाच्या बांधवांना जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभ पद्धतीने मिळावे, तसेच रक्त नात्यातील व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत तातडीने परिपत्रक काढण्यात यावे, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीत अनुसूचित जमातीतील नागरिकांना जातीचे दाखले आणि जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया सुलभ करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले होते. या बैठकीच्या इतिवृत्तानुसार शासनाने परिपत्रक जारी करणे अपेक्षित होते. मात्र, विधानसभा, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे लागू झालेल्या आचारसंहितेमुळे या प्रक्रियेला विलंब झाला असल्याची खंत कोळी समाजाने व्यक्त केली.

गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित असून शासनाच्या दिरंगाईमुळे समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून संबंधित परिपत्रक त्वरित जारी करण्यात यावे, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे करण्यात आली.

यावेळी कोळी महासंघाच्या वतीने संदीप मोरे, बंडा मोरे, जयंत होळकर, सुनील पवार, पोपट मोरे, कानिफ मोरे, उद्धव मोरे, मिथुन मोरे, लक्ष्मण मोरे, पंडा मोरे, शामराव मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने कोळी समाज बांधव उपस्थित होते.



प्रमुख मागण्या– अनुसूचित जमातीतील कोळी समाजाच्या नागरिकांना जातीचे दाखले सुलभ पद्धतीने मिळावेत तसेच रक्त नात्यातील व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सोपी करावी व २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करावी व संबंधित परिपत्रक त्वरित जारी करण्यासाठी शासनाने आवश्यक कार्यवाही करावी व प्रलंबित प्रश्नांवर मुख्यमंत्री स्तरावर तातडीने निर्णय घ्यावा.

# SPOT NEWS



## राज्यस्तरीय सह्याद्रीरत्न पुरस्काराने कु. आराध्या शिंदे सन्मानित

**● अकोले । वीरभूमी–**

अभिनव पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेत असलेल्या कु. आराध्या महेश शिंदे हिला राज्यस्तरीय सह्याद्रीरत्न पुरस्कार २०२६ सोहळा प्रदान करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या नृत्य कलारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नृत्य क्षेत्रातील तिची उल्लेखनीय कामगिरी, अथक मेहनत, जिद्द, समर्पण आणि उत्कृष्ट कलागुणांची दखल घेऊन हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तिच्या या यशामागे तिची मेहनत, पालकांचे प्रोत्साहन तसेच तिच्या नृत्य प्रशिक्षिका काव्या कदम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. दि. १४ जून २०२६ रोजी पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय सह्याद्रीरत्न पुरस्कार सोहळ्यात सुप्रसिद्ध सिनेअभिनेते सुनील नाना गोडबोले, मराठी चित्रपट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन धवणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे तसेच 'देऊळ बंद' चित्रपटातील बालकलाकार आर्या घारे यांच्या प्रमुख उपस्थितीत आराध्याला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कु. आराध्या शिंदे हिने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर शाळा, कुटुंब आणि परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही ती नृत्य क्षेत्रात अशीच यशाची नवी शिखरे सर करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## जय मल्हार विद्यालयात विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या शाळेच्या पहिल्याच दिवशी जय मल्हार विद्यालयात आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गळ्यामध्ये पुष्पहार घालून वाजत मिरवणुकीने त्यांना विद्यालयामध्ये आणण्यात आले. विद्यालयामध्ये आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके, दप्तर आणि वह्या यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कमल दिवेकर हिने विद्यालयातील विद्यार्थ्यांना १०० दप्तर किट उपलब्ध करून दिले.या कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक उत्तम सुंबरे, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक उंडे बी आर, माजी पोलीस अधिकारी बाबाजी जगताप, मा सरपंच नानाभाऊ भांबरे, हभप आकाश महाराज घोलप, जिल्हा परिषदेचे शिक्षक नरवडे, माजी विद्यार्थिनी कमल दिवेकर, पंचायत समितीचे अधिकारी बांडे साहेब, ग्रामस्थ राजाराम भांबरे,शिक्षक गर्कळ सर, भगवान भांबरे, गौरी जगताप, संतोष घुले, नारायण पुंडे, पंडित बाई व विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी, पिंपळगावरोठा ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्मवीर काळे सहकारी साखर कारखान्यात मिल रोलरचे पूजन

## ७२ व्या गळीत हंगामाच्या तयारीला प्रारंभ । ऊसतोडणी व वाहतूक यंत्रणेसाठी ॲडव्हान्स वाटप सुरू

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या २०२६-२७ या वर्षातील ७२ व्या गळीत हंगामाच्या तयारीच्या दृष्टीने मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम मंगळवार (दि.१६) रोजी उत्साहात संपन्न झाला. कारखान्याचे ज्येष्ठ संचालक व मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे आणि कारखान्याचे चेअरमन आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक सचिन चांदगुडे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.



मिल रोलर पूजनानंतर कारखान्याच्या ७२ व्या गळीत हंगामाच्या तयारीला अधिकृत सुरुवात झाली आहे. येणाऱ्या गळीत हंगामाच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून दरवर्षी करण्यात येणारे मिल रोलर पूजन यंदाही पार पडले. मागील वर्षी कारखान्याच्या संपूर्ण नूतनीकरणाचे काम पूर्ण झाल्याने अनेक तांत्रिक अडचणी कमी झाल्या आहेत. तरीही दरवर्षीप्रमाणे यंत्रसामग्रीची देखभाल व दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी कारखाना प्रशासनाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असून ही कामे प्रगतीपथावर आहेत.

मिल रोलर पूजन हा कारखाना सुरू होण्याचा संदेश मानला जातो. त्यामुळे परिसरातील छोट्या-मोठ्या व्यावसायिकांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण होते आणि स्थानिक अर्थकारणालाही गती मिळण्यास मदत होते. त्यामुळे या पूजनाला विशेष महत्त्व आहे. तसेच आगामी गळीत हंगामाच्या दृष्टीने ऊसतोडणी व वाहतूक यंत्रणेच्या भरतीसह ॲडव्हान्स वाटपाची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली.

चालू वर्षी मान्सूनवर एलनिनोचे सावट असल्याने जून महिन्याचा अर्धा कालावधी उलटूनही समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर करण्यासाठी सुरू असलेल्या सिंचनाच्या आवर्तनाला स्थगिती देण्यात आली असून ऊस शेतीसमोर आव्हान निर्माण झाले आहे.

परिस्थिती काहीशी चिंताजनक असली तरी शेतकऱ्यांनी सिंचनासाठी पाण्याचा जपून वापर करावा. संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता अवाजवी खर्च टाळावा तसेच पुरेसा पाऊस पडेपर्यंत पेरण्या करू नयेत. शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले.

याप्रसंगी कारखान्याचे व्हाइस चेअरमन प्रवीण शिंदे, संचालक दिलीपराव बोरनारे, सूर्यभान कोळपे, सुधाकर रोहोम, राजेंद्र घुमरे, सचिन चांदगुडे, श्रीराम राजेभोसले, राहुल रोहमारे, शंकरराव चव्हाण, अनिल कदम, अशोक मवाळ, सुनील मांजरे, प्रशांत घुले, मनोज जगझाप, वसंतराव आभाळे, डॉ. मच्छिंद्र बर्डे, दिनार कुदळे, श्रावण आसने, गंगाधर औताडे, सुरेश जाधव, विष्णू शिंदे, कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनील कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबा सय्यद, सहाय्यक सेक्रेटरी संदीप शिरसाठ, चीफ इंजिनिअर निवृत्ती गांगुर्डे, चीफ केमिस्ट सूर्यकांत ताकवणे तसेच विविध खात्यांचे प्रमुख पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## श्रीगोंद्यात काळ्या काचा व वाहतूक नियमभंगाविरुद्ध धडक कारवाई करत ८६ वाहनचालकांवर कारवाई

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध पोलिसांनी धडक कारवाई सुरू ठेवली असून, मंगळवार दिनांक १६ जून २०२६ रोजी विविध प्रकारच्या वाहतूक नियमभंगाच्या एकूण ८६ केसेस करण्यात आल्या. या कारवाईत एकूण १ लाख ४२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

वाहतूक पोलिसांनी विशेषतः वाहनांवरील काळ्या काचा (ब्लॅक फिल्म) हटविण्याची मोहीम तीव्र केली असून, अशा २१ वाहनांवर कारवाई करून १३ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. तसेच वाहन चालविताना परवाना नसलेल्या २९ जणांविरुद्ध कारवाई करून तब्बल ८९ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

याशिवाय विनाहेल्मेट वाहन चालविणाऱ्या ४ जणांवर ४ हजार रुपये, ट्रिपल सीट वाहन चालविणाऱ्या ३ जणांवर ३ हजार रुपये, सीट बेल्ट न लावणाऱ्या ४ वाहनचालकांवर ४ हजार रुपये दंड आकारण्यात आला. तसेच विनानंबर वाहन चालविणाऱ्या २७ जणांकडून १९ हजार ५०० रुपये, तर नो पार्किंगमध्ये वाहने उभी करणाऱ्या ६ जणांकडून ६ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने तसेच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

वाहतूक शाखेतील पोलीस कॉन्स्टेबल आजिनाथ जाधव आणि गोरख जाधव यांनी ही कारवाई प्रभावीपणे पार पाडली. वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहन श्रीगोंदा पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## पारनेर नगरपंचायत निवडणुकीसाठी भाजपची जोरदार तयारी

### 'प्रभागनिहाय विकास अभियान' राबवून शहर विकासासाठी भरीव निधी : कल्याण थोरात

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर नगरपंचायतीच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने आतापासूनच कंबर कसली असून, शहरात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी आणि सक्षमपणे निवडणूक लढविण्यासाठी विशेष 'प्रभागनिहाय विकास अभियान' राबविण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे तालुका चिटणीस कल्याण थोरात यांनी दिली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील आणि भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. या माध्यमातून शासनाकडून भरीव निधी उपलब्ध करून शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील, असे थोरात यांनी स्पष्ट केले.

या अभियानांतर्गत प्रत्येक प्रभागातील मूलभूत समस्या, नागरिकांच्या गरजा आणि विकासकामांचा अभ्यास करून त्यानुसार नियोजन करण्यात येणार आहे. शहराच्या सर्व भागांमध्ये विकासकामे प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार सक्षमपणे कार्यरत असल्याचे सांगत, आगामी नगरपंचायत निवडणूकही महायुतीच्या माध्यमातून लढविण्यात येणार असल्याचे थोरात यांनी नमूद केले.

पक्षांतराच्या चर्चांवर भाष्य करताना ते म्हणाले की, प्रत्येक राजकीय पक्षाला आपला विस्तार करण्याचा अधिकार आहे. मात्र, भाजप संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करत असून, प्रत्येक प्रभागात सक्षम उमेदवार उभा करण्याची तयारी सुरू आहे. प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांच्या नेतृत्वाखाली मागील निवडणुकीत भाजपने दिलेली प्रभावी लढत पाहता, यंदाही पक्ष पूर्ण ताकदीने मैदानात उतरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नगरसेवक अशोक चेडे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रवेशाबाबत प्रतिक्रिया देताना थोरात यांनी सांगितले की, चेडे यांनी पक्षांतर केले असले तरी भाजपसोबत असताना महायुतीचे घटक म्हणून आमदार काशिनाथ दाते यांनी त्यांच्या प्रभागातील विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला होता. ही बाब नागरिकांनी लक्षात ठेवावी, असेही त्यांनी नमूद केले.

# दैनंदिन अध्यापनाबरोबरच वर्गात 'गप्पांचा तास' घ्यावा

## डॉ. ज्योती परिहार । इंदिरानगर जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**● तिसगाव । वीरभूमी –**

विद्यार्थ्यांचे भावविश्व, त्यांच्या भावना, समस्या आणि मनातील गोष्टी समजून घ्यायच्या असतील, तर नियमित अध्यापनाबरोबरच वर्गात 'गप्पांचा तास' घेणे अत्यंत आवश्यक आहे. अशा मुक्त संवादामुळे मुले बोलकी होतात, त्यांच्यातील भीती व संकोच कमी होतो. परिणामी शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडथळे समजून घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करता येतात. प्रत्येक मुलाची बुद्धिमत्ता, क्षमता आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. त्यामुळे विद्यार्थीकेंद्रित शिक्षणावर भर देत प्रत्येक मुलाकडे स्वतंत्रपणे लक्ष देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या सहाय्यक संचालक डॉ. ज्योती परिहार यांनी केले.

इंदिरानगर (तिसगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित शाळा प्रवेशोत्सव व नवागत स्वागत कार्यक्रमात त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

यावेळी पुणे शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी बाबुराव जाधव, गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड, केंद्रप्रमुख सुभाष सोनवणे, शिक्षक नेते कल्याण लवांडे, शाळेचे मुख्याध्यापक धुराजी गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राहुल वाबळे तसेच ग्रामस्थ, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी नवीन शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षणाच्या प्रवासात सातत्य, जिज्ञासा आणि प्रामाणिकपणा जपण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. लेझीमच्या तालावर विद्यार्थ्यांनी नवागतांचे जल्लोषात स्वागत केले. पारंपरिक पद्धतीने झालेल्या या स्वागतामुळे शाळेचा परिसर चैतन्यमय झाला होता. नवीन विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आपुलकी आणि आत्मीयतेची भावना निर्माण झाली.

याप्रसंगी शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांअंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नवीन पुस्तके आणि गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे कार्य करण्याची गरज असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांच्या संख्येच्या स्पर्धेतही शाळेने आपली विद्यार्थीसंख्या टिकवून ठेवल्याबद्दल आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मान्यवरांनी शाळेचे कौतुक केले.

कार्यक्रमाला पालक, ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी शाळेचे शिक्षक बाबासाहेब बोरसे, सुवर्णा सांगळे, वैशाली असलकर, उज्वला घोरपडे आणि श्वेता वांढेकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्वेता वांढेकर यांनी केले, तर आभार बाबासाहेब बोरसे यांनी मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## SPOT NEWS

### केडगावच्या सरस्वती विद्यामंदिरात चिमुकल्यांचे उत्साहात स्वागत

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
डॉक्टर हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान संचलित सरस्वती प्राथमिक विद्या मंदिर, केडगाव येथे विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करत नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शाळेत दाखल झालेल्या नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन, टाळ्यांच्या गजरात तसेच औक्षण करून आपुलकीने स्वागत करण्यात आले. शिक्षकांनी केलेल्या या प्रेमळ स्वागतामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दादा राम ढवाण, संस्थेचे सहकार्यवाह डॉ. रवींद्र चोभे, संस्था समन्वयक गोकुळदास लोखंडे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य दादासाहेब काजळे तसेच शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष दादा ढवाण यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत शिक्षणासोबतच शिस्त, नियमित उपस्थिती, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. नवीन पुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांसह पालकांनीही समाधान व्यक्त केले. शाळेतील सकारात्मक आणि उत्साही वातावरणामुळे विद्यार्थ्यांचा पहिला दिवस अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता खिलारी यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक संदीप भोर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रुग्णांना अधिक चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध द्या

### आमदार आशुतोष काळे । कोपरगाव उपजिल्हा रुग्णालयाचे कामांची केली पहाणी

**● कोपरगाव । वीरभूमी –**
सनियंत्र सल्लागार समितीची बैठक नुकतीच आमदार आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या बैठकीत रुग्णालयातील आरोग्य सेवा, उपलब्ध सुविधा तसेच रुग्णांना मिळणाऱ्या उपचारांच्या गुणवत्तेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी रुग्णालय प्रशासनाला रुग्णांना अधिक चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या.

रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, आवश्यक औषधे व वैद्यकीय सुविधा उपलब्ध असाव्यात तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.तसेच रुग्णालयातील स्वच्छता, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाय योजना तातडीने राबविण्याच्या सूचना केल्या. सर्वसामान्य नागरिकांना शासकीय आरोग्य सेवांचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम



करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी रुग्णालय सनियंत्र सल्लागार समितीच्या सदस्यांसमवेत २८.८४ कोटी निधीतून सुरु असलेल्या १०० बेडच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या कामाची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला. उपजिल्हा रुग्णालयाच्या कामासाठी अधिकच्या निधीची गरज पडल्यास निधी मिळवून देणार असल्याचे सांगत लवकरच हे काम पूर्ण होऊन सुसज्ज उपजिल्हा रुग्णालय रुग्णांच्या सेवेत दाखल होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, गट विकास अधिकारी संदीप दळवी, आरोग्य अधिकारी डॉ. गिरीश गुट्टे, डॉ. कृष्णा फुलसुंदर, डॉ. उंबरकर, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य डॉ. अजय गर्जे, सार्वजनिक बांधकाम उपभियांता वर्षराज शिंदे, पशु संवर्धन अधिकारी श्रीमती काटे, नगरसेवक इम्तियाज अत्तार, सौ. कविता नाईकवाडे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, डॉ. आतिश काळे, डॉ. तुषार गलांडे, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, हाजीमेहमूद सय्यद, विजय त्रिभुवन, वाल्मिक लहिरे, शैलेश साबळे, सोमेश आढाव, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक विरेन बोरावके, रमेश गवळी, बाळासाहेब आढाव, अजीज शेख, फकीर कुरेशी, दिनकर खरे, सचिन ठोळे, नवाज कुरेशी, शुभम काळे, मनोज नरोडे, धनंजय कहार, सागर फडे, मुकुंद भूतडा, नितेश बोरुडे, सागर आहेर, संतोष मरसाळे, अशोक आव्हाटे, सचिन परदेशी, मुकुंद इंगळे, जावेद शेख, भाऊसाहेब भाबड, चंद्रकांत धोत्रे, राजेंद्र आभाळे, राजेंद्र खैरनार, संतोष दळवी, विकी चांदर, तन्मय साबळे, वैभव कानडे, हारुन शेख, फैय्याज, मयुरेश शिंदे, मयुर राऊत, बाबासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

# शालेय साहित्याच्या सक्तीच्या विक्रीवर कारवाईचे आश्वासनानंतर भानुदास साळवे यांचे उपोषण स्थगित

**● पारनेर । वीरभूमी–**
तालुक्यातील काही शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याच्या सक्तीच्या विक्रीविरोधात भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोश संघटनेचे जिल्हा संघटक भानुदास पांडुरंग साळवे यांनी पारनेर तहसील कार्यालयासमोर १५ जून २०२६ रोजी सुरू केलेले उपोषण गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी प्रकाश पवार यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.




तालुक्यातील काही शाळांकडून विद्यार्थ्यांच्या पालकांना पुस्तके, वह्या, गणवेश तसेच बूट शाळेतूनच खरेदी करण्यास सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. या कथित मनमानी कारभाराविरोधात भानुदास साळवे यांनी आवाज उठवत उपोषणाचे हत्यार उपसले होते. उपोषणादरम्यान त्यांनी संबंधित शाळांची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याची मागणी केली होती.

यासंदर्भात पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी प्रकाश पवार यांनी दिलेल्या पत्रामध्ये काही महत्त्वपूर्ण निर्देश जारी करण्यात आले आहेत. त्यानुसार, शाळांनी आपल्या आवारात शालेय साहित्याची विक्री तात्काळ बंद करावी, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. तसेच, शाळांच्या प्रवेशद्वारावर किंवा कार्यालयात 'शाळेत शालेय साहित्याची विक्री केली जात नाही' असा फलक लावणे आणि शासनाचा हेल्पलाइन क्रमांक दर्शविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

पालकांना आवश्यक साहित्याची यादी देऊन त्यांना त्यांच्या पसंतीच्या दुकानातून साहित्य खरेदी करण्याचे स्वातंत्र्य देण्यात यावे, तसेच याबाबत पालकांच्या मोबाईलवर संदेश पाठविण्याच्या सूचनाही शाळांना देण्यात आल्या आहेत.

शाळांमधील पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी १ ते १५ जून या कालावधीतील सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, शाळांकडून आकारण्यात येणाऱ्या फी आणि बस शुल्काचे विशेष लेखापरीक्षण (ऑडिट) करून त्याचा अहवाल सार्वजनिक करण्याचे आश्वासनही शिक्षण विभागाने दिले आहे.

गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी प्रकाश पवार यांनी ३० जून २०२६ पर्यंत चौकशी पूर्ण करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर भानुदास साळवे यांनी आपले उपोषण स्थगित केले.

या निर्णयामुळे पालकांना मोठा दिलासा मिळाला असून, शाळांच्या व्यावसायिक धोरणांवर काही प्रमाणात अंकुश बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शिक्षण विभागाने दिलेल्या आश्वासनांची प्रभावी अंमलबजावणी होते का, याकडे आता पालकांसह सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कोपरगाव शहर आणि तालुक्यातील वाढत्या चोऱ्या व संघटित गुन्हेगारीला आळा घाला

### आमदार विवेक कोल्हे यांच्या प्रशासनाला सूचना

**● कोपरगाव । वीरभूमी–**
शहर व तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून घरफोडी, चोरी, शेतमाल चोरी तसेच संघटित गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक भागांमध्ये रात्रीच्या वेळी चोरांचा मुक्त वावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये आढळून आला असून पोलिसांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे आमदार विवेक कोल्हे यांनी म्हटले आहे.

अलीकडेच कोपरगाव शहरातील संयकमनगर, गावावरेनगर येथील चोरीच्या घटना गंभीर आहेत. काही दिवसांपूर्वी गांधीनगर परिसरात पहाटेच्या सुमारास चारचाकी वाहनातून आलेल्या अज्ञात चोरट्यांनी दोन ठिकाणी घरफोडीचा प्रयत्न केल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. तसेच तालुक्यात विविध ठिकाणी शेतमाल चोरी, घरफोडी आणि इतर गुन्हेगारी प्रकारांच्या तक्रारी सातत्याने



पुढे येत आहेत. विविध भागात ड्रोन कॅमेरा रात्रीच्या वेळी घरावर घिरट्या घालतात या संदर्भात ग्रामीण भागातील नागरिक व शेतकरी वर्ग यात मोठी दहशत निर्माण झाली आहे अशा गोष्टी सामाजिक सुरक्षेला बाधा निर्माण करण्याचे काम करतात.

या पार्श्वभूमीवर कोपरगाव शहर पोलीस ठाणे व कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरीत्या विशेष मोहीम राबवून अशा विविध गुन्ह्यातील आरोपींना तातडीने जेरबंद करावे, रात्रीची गस्त वाढवावी, संवेदनशील भागांमध्ये पोलिसांची उपस्थिती वाढवावी तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा शोध घेऊन चोऱ्यांच्या घटनांचा सखोल तपास करावा, अशी चर्चा वरिष्ठ पोलिस अधिकारी व स्थानिक पोलिस स्टेशन अधिकारी यांच्याशी आमदार विवेक कोल्हे यांनी केली आहे.

कायद्याचा धाक निर्माण होणे आणि नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करणे ही पोलिस यंत्रणेची प्राथमिक जबाबदारी असल्याचे सांगत, वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना दूर करण्यासाठी प्रभावी व तात्काळ कारवाई होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कोपरगाव शहर व तालुक्यात शांतता, सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष कृती आराखडा राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, असे आवाहन आमदार विवेक कोल्हे यांनी केले आहे.

# कर्णबधिर विद्यार्थिनी प्रिया कातोरेच्या आयुष्यात नवा सूर

### विखे परिवाराच्या मदतीने मिळाले श्रवणयंत्र । पहिल्यांदाच स्पष्ट आवाज ऐकताच प्रियाच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**● अकोले । वीरभूमी–**
जन्मापासूनच ऐकण्याच्या समस्येमुळे अनेक अडचणींना सामोरे जाणाऱ्या प्रिया कातोरे या आठ वर्षीय विद्यार्थिनीच्या आयुष्यात विखे परिवाराच्या मदतीमुळे नव्या आशेचा किरण उजळला आहे. श्रवणयंत्र मिळाल्यानंतर पहिल्यांदाच स्पष्ट आवाज ऐकू आल्याने प्रियाच्या चेहऱ्यावर आनंद झळकत असून तिच्या शैक्षणिक वाटचालीलाही नवे बळ मिळाले आहे.

प्रिया कातोरे ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उंचखडक बु. येथे इयत्ता तिसरीत शिक्षण घेत आहे. लहानपणापासूनच ती कर्णबधिर असल्याने तिच्या पालकांनी विविध डॉक्टर, सामाजिक संस्था तसेच अनेक लोकप्रतिनिधींकडे श्रवणयंत्रासाठी प्रयत्न केले. मात्र, त्यांना अपेक्षित सहकार्य मिळू शकले नाही.

दरम्यान, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ड. सागर शिंदे यांनी या समस्येची दखल घेत विविध स्तरांवर पाठपुरावा सुरू केला. अकोले विखे पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष विकास वाकचौरे यांच्या माध्यमातून ही बाब जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. विद्यार्थिनीची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी तत्काळ मदतीचा हात पुढे करत प्रियाला दर्जेदार श्रवणयंत्र उपलब्ध करून दिले.





प्रिया ही आदिवासी समाजातील असून तिच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. तिचे आई-वडील उंचखडक बु. येथील एका शेतकऱ्याकडे वाटेकरी म्हणून काम करतात. राहण्यासाठी पक्के घर नसल्याने कुटुंब कुडाच्या कोपीत वास्तव्यास आहे. अशा परिस्थितीत मुलीच्या उपचाराचा खर्च करणे त्यांना शक्य नव्हते.

शाळेत येऊनही प्रिया शिक्षकांचे अध्यापन समजू शकत नव्हती. इतर विद्यार्थी हसले की तीही त्यांच्याकडे पाहून हसत असे. तिची अवस्था पाहून तिला काही काळ कर्णबधिर शाळेत दाखल करण्यात आले होते. मात्र, तेथील वातावरणाशी जुळवून घेण्यात अडचणी येत असल्याने तिला पुन्हा उंचखडक बु. येथील जिल्हा परिषद शाळेत दाखल करण्यात आले.

यानंतर ड. सागर शिंदे यांनी अकोले, संगमनेर, नाशिक, पुणे आणि मुंबई येथील विविध सामाजिक संस्थांशी संपर्क साधला. तसेच काही आजी-माजी आमदार आणि खासदारांकडेही मदतीची विनंती केली. मात्र, या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळाले नाही. अखेर विकास वाकचौरे यांच्या माध्यमातून हा विषय विखे पाटील यांच्यापर्यंत पोहोचला आणि लोणी येथे प्रियाला ब्रँडेड श्रवणयंत्रासह अन्य आवश्यक वस्तूंचे साहित्य देण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रियाच्या कानात हे श्रवणयंत्र बसविण्यात आले. कालपर्यंत केवळ ओठांच्या हालचाली आणि चेहऱ्यावरील भाव पाहून संवाद साधणारी प्रिया आज वर्गातील विद्यार्थ्यांचा गोंधळ आणि त्यांचे आवाज ऐकून आनंदित झाली होती. वर्गशिक्षिका क्षीरसागर मॅडम यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही तिने उत्साहाने दिली.

योगायोगाने हा दिवस जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसाचा होता. त्यांच्या या मदतीमुळे प्रियाच्या आयुष्याला नवी दिशा मिळाल्याची भावना भाऊमामा खरात यांनी व्यक्त केली.

# म्हातारपिंपरीतील श्री भैरवनाथ मंदिरात मराठाकालीन ऐतिहासिक शिलालेखाचा शोध

## इ.स. १७४३ मधील १५ ओळींच्या शिलालेखातून ग्रामप्रशासन, वतनदारी व्यवस्था आणि मंदिरनिर्मिती परंपरेवर प्रकाश

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**
श्रीगोंदा तालुक्यातील मौजे म्हातारपिंपरी येथील प्रसिद्ध ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिर परिसरात एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक शिलालेख आढळून आला आहे. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या उजव्या भिंतीवर कोरलेला हा शिलालेख मराठाकालीन इतिहास, ग्रामीण प्रशासन, मंदिरनिर्मिती परंपरा आणि ग्रामदेवता उपासनेचा महत्त्वाचा दस्तऐवज मानला जात आहे. विशेष म्हणजे, म्हातारपिंपरी गावात उपलब्ध झालेला हा पहिलाच ऐतिहासिक शिलालेख असल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

हा शिलालेख १५ ओळींचा असून देवनागरी लिपीत आणि मराठी भाषेत कोरलेला आहे. शिळा गुळगुळीत असून त्यावरील अक्षरे अत्यंत रेखीव, खोलगट आणि आजही स्पष्टपणे वाचता येण्यासारखी आहेत. शिलालेखावर कालांतराने रंगरंगोटी झाल्यामुळे काही कोपऱ्यांतील अक्षरे किंचित झिजली असली, तरी छाप घेतल्यानंतर संपूर्ण लेखन वाचनीय झाले आहे. लेखाच्या मध्यभागी कोरलेले नांगराचे चिन्ह हे तत्कालीन पाटीलकी आणि मोकदमी व्यवस्थेचे प्रतीक मानले जाते.

शिलालेखात शके १६६५, रुधिरोद्गारी नाम संवत्सर, श्रावण शुद्ध पंचमी, गुरुवार अशी स्पष्ट कालनोंद आढळून येते. फसली सन ११५२, म्हणजेच १४ जुलै १७४३ रोजी हा धार्मिक उपक्रम पूर्ण झाल्याची नोंद त्यात करण्यात आली आहे.

या शिलालेखानुसार, येमाजी वलद यशवंतराव वाबळे पाटील मोकदम, मौजे म्हातारपिंपरी, परगणा कर्डे, सरकार जुन्नर यांच्या पाच पुत्रांनी – संताजीराव, राणोजी, चापाजी, जानोजी आणि येसवंतराव वाबळे यांनी लोककल्याणार्थ हे महादेव मंदिर उभारले. जयाचे चरणी दृढ भाव या शब्दांतून ग्रामदैवत भैरवनाथाविषयीची श्रद्धा आणि भक्तिभाव व्यक्त झाल्याचे दिसून येते.

शिलालेखाच्या लेखनकार्याचाही त्यात उल्लेख असून बिकलम दामाजी, धर्माजी कुळकर्णी आणि नित्यानंद दामोदर जोशी यांनी लेखन व नोंदणीचे कार्य केल्याचे नमूद करण्यात आले आहे. यावरून त्या काळातील गावपातळीवरील लेखनिक, महसुली आणि धार्मिक अधिकाऱ्यांची भूमिका स्पष्ट होते.

म्हातारपिंपरी येथील हा शिलालेख मराठाकालीन ग्रामीण समाजव्यवस्था, वतनदारी पद्धती, ग्रामप्रशासन, धार्मिक जीवन आणि मंदिरनिर्मिती परंपरेच्या अभ्यासासाठी महत्त्वाचा पुरावा मानला जात आहे. मौजे म्हातारपिंपरी, परगणा कर्डे, सरकार जुन्नर असा स्पष्ट उल्लेख असल्याने तत्कालीन प्रशासकीय विभागांच्या रचनेचा अभ्यास करण्यास मदत होते. तसेच एका कुटुंबातील अनेक सदस्यांची नावे नोंदविल्यामुळे स्थानिक घराण्यांचा इतिहास आणि वंशावळीच्या अभ्यासासाठीही हा लेख उपयुक्त ठरत आहे.



### मराठाकालीन ग्रामीण समाजरचनेचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज

■ हा शिलालेख केवळ मंदिरनिर्मितीची नोंद नसून मराठाकालीन ग्रामीण समाजरचना, ग्रामदेवता उपासना, स्थानिक सत्ताकेंद्रे, वतनदारी व्यवस्था, प्रशासकीय विभाग, लेखनिक परंपरा आणि कौटुंबिक इतिहास यांचा एकत्रित दस्तऐवज म्हणून अत्यंत महत्त्वाचा ऐतिहासिक स्रोत ठरतो, असे मत शिलालेख वाचक अनिल किसन दुधाणे यांनी व्यक्त केले.

शिलालेखातील नांगराचे चिन्ह हे कृषिप्रधान समाजव्यवस्था आणि पाटीलकीचे प्रतीक मानले जात असल्याने वाबळे घराण्याचे गावच्या प्रशासनातील महत्त्व अधोरेखित होते. तसेच बिकलम या शब्दामुळे तत्कालीन शिलालेख लेखनपद्धती आणि दस्तऐवज निर्मिती प्रक्रियेबाबतही महत्त्वाची माहिती उपलब्ध होत आहे.

या शिलालेखाचे शोधकार्य, छायाचित्रण आणि छाप घेण्याचे कार्य शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचालित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीच्या माध्यमातून करण्यात आले. या कार्यात राजेश इंगळे, मारुती वागस्कर, विक्रम वाबळे, नितीन वाबळे, दिगंबर भुजबळ, सचिन भोसले, सोमनाथ गोसावी तसेच म्हातारपिंपरी ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले. या शिलालेखाचे संशोधक राजेश इंगळे असून, शिलालेख वाचनाचे कार्य अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

# पळवे खुर्द येथे नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

## प्रवेशोत्सव सोहळ्यात फुलांच्या वर्षावात स्वागत; विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप

● **पारनेर । वीरभूमी–**
पारनेर तालुक्यातील पळवे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी नवागत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास पारनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.




शाळेत प्रथमच पाऊल ठेवणाऱ्या चिमुकल्यांच्या स्वागतासाठी शाळा प्रशासनाने विशेष तयारी केली होती. प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती, तर शाळेत उभारण्यात आलेला 'सेल्फी पॉइंट' विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरला. विद्यार्थी शाळेच्या आवारात दाखल होताच त्यांचे फुलांच्या वर्षावात आणि टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करण्यात आले. प्रत्येक नवागत विद्यार्थ्याला पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्नेहपूर्वक स्वागत करण्यात आले.

यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. उन्हाळी सुट्टीनंतर मित्र-मैत्रिणींना पुन्हा भेटल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होता.

याप्रसंगी गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांचे कौतुक केले. तसेच, शाळेच्या मुख्याध्यापिका आणि शिक्षकांनी कार्यक्रमाचे केलेले नियोजन अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, गावचे सरपंच, उपसरपंच, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे पदाधिकारी, दूध संस्थांचे प्रतिनिधी, गणेश तरुण मंडळाचे सदस्य तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा कोतकर आणि उपशिक्षिका मनीषा रोकडे यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळेच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे पळवे खुर्दसह संपूर्ण पंचक्रोशीत कौतुक होत असून, या उत्साही वातावरणामुळे नवीन शैक्षणिक वर्षाची सकारात्मक आणि आश्वासक सुरुवात झाली आहे.

प्रवेशोत्सव कार्यक्रमानिमित्त पारनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

# ७.५ कोटी निधीच्या शेत पाणंद रस्त्यांच्या कामाला प्रशासकीय मान्यता : आ. आशुतोष काळे

● **कोपरगाव । वीरभूमी–**
मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेतून बारमाही, मजबूत रस्त्यांचे बांधकाम करून पेरणी, मशागत, कापणी आणि शेतमाल वाहतुकीस गती देण्यासाठी कोपरगाव मतदार संघातील शेतकऱ्यांच्या रस्त्याच्या अडचणी सोडविण्यासाठी निधी मिळावा यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी महायुती शासनाकडे केलेल्या पाठपुराव्यातून कोपरगाव मतदार संघातील ७.५ कोटी निधीच्या शेत पाणंद रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.



ग्रामीण भागातील नागरीकांना शेत, पाणंद रस्त्यांची वाढती गरज लक्षात घेवून व शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी व भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय म्हणून महायुती शासनाने सुरु केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेतून जास्तीत जास्त लोकवस्ती असलेल्या रस्त्यांच्या कामांना गती देण्यासाठी जास्तीत जास्त निधी कसा मिळविता येईल यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्याला मिळालेल्या यशामुळे मतदार संघाच्या अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेत-पाणंद रस्त्यांच्या अडचणी कायमच्या दूर होणार आहेत.

पावसाळ्यात चिखल व साचलेल्या पाण्यामुळे रस्ते बंद राहतात त्यामुळे बैलगाडी, ट्रॅक्टर देखील शेतात जावू शकत नाही. पेरणी आणि कापणीच्या वेळी जर अशी परिस्थिती असेल तर शेतकऱ्यांच्या अडचणीत अधिकच वाढतात. याची दखल घेवून महायुती शासनाने शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना सुरु केली आहे. पाणंद रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना शेतात सुलभपणे ये-जा करता येणार आहे. तसेच पेरणी आणि काढणीच्या हंगामात शेती मालाची वाहतूक अडचण कमी होवून शेतमाल बाजारात पोहचवण्यासाठीचा खर्च निश्चितपणे कमी होणार असून तातडीने बाजारपेठेशी संपर्क होण्यास मोठी मदत होणार आहे. चिखल,पावसाळा किंवा खराब रस्त्यांच्या समस्यांपासून शेतकऱ्यांची कायमची सुटका होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीव्यवस्थेला मोठा आधार मिळणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे. महायुती शासनाने कोपरगाव मतदार संघातील ७.५ कोटी निधीच्या शेत पाणंद रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिल्याबद्दल आमदार आशुतोष काळे यांनी आभार मानले आहेत.

# विद्यार्थ्यांमधील माणूस घडविण्याची जबाबदारी शिक्षक व पालकांची

## डॉ. ज्योती परिहार । श्री विवेकानंद विद्यामंदिरमध्ये नवागतांचे ढोल-ताशांच्या गजरात जंगी स्वागत

● **पाथर्डी । वीरभूमी–**
आजच्या विद्यार्थ्यांमध्ये माणूसपणाचे संस्कार रुजवून सुसंस्कृत नागरिक घडविण्याची जबाबदारी शिक्षकांसोबतच पालकांचीही असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण उपसंचालक डॉ. ज्योती परिहार यांनी केले.

शहरातील श्री विवेकानंद विद्यामंदिर, पाथर्डी (प्राथमिक व माध्यमिक विभाग) येथे नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त आयोजित प्रवेशोत्सव व पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण उपसंचालक डॉ. ज्योती परिहार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. परिहार म्हणाल्या, आजचा बालक हा उद्याच्या प्रगतशील भारताचा नागरिक आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने दर्जेदार शिक्षण घेऊन आई-वडिलांचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे. विद्यार्थ्यांमधील माणूसपण हरवत चालले असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाने विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार करण्याची गरज अधोरेखित केली.

संस्थेचे उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड यांनी पालकांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी वेळोवेळी शालेय प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात, असे आवाहन केले. संस्थेचे विश्वस्त कुणाल आव्हाड यांनी पालकांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाला संस्था व शाळेतील प्रत्येक घटक कटिबद्ध राहील, अशी ग्वाही दिली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून अध्ययन-अध्यापन कौशल्यासह विविध सहशालेय उपक्रम वर्षभर राबविले जातील, असे त्यांनी सांगितले.

शाळेतील अध्ययन-अध्यापनासाठीचे पूरक वातावरण, सुसज्ज परिसर आणि नियोजनाबाबत उपस्थित मान्यवर व पालकांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर शिक्षण उपसंचालक डॉ. ज्योती परिहार, प्रशासकीय अधिकारी बाबुराव जाधव, गटशिक्षण अधिकारी शिवाजी कराड, विश्वस्त कुणाल आव्हाड, प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे, मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी, पर्यवेक्षक संपत घारे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बहुसंख्येने पालकांनीही उपस्थिती लावली.

प्रवेशोत्सवानिमित्त सर्व विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांवर गुलाबपुष्पांची उधळण करण्यात आली तसेच नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प आणि पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी यांनी केले. मुख्याध्यापक शरद मेढे यांनी विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले. सूत्रसंचालन आशा बांदल व गार्गी तरवडे यांनी केले, तर आभार ज्ञानेश्वर गायके यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.